## सार्वजनिक आरोग्य विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी २००६

### अधिसूचना

**जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्र. जमृनों. २००३/१३६२/प्र.क्र. २९७/कु.क. ३.— जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) च्या कलम ३० अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाच्या मान्यतेने खालील नियम, महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० सुधारित करण्यासाठी, तयार करीत आहे :—

१. सदर नियमांना महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारित) नियम, २००६ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम ७ च्या बदली, खालील नियम करण्यात येत आहे :—

" **७. कलम १० (२) अनुसार प्रमाणपत्राचा नमुना :**—(१) मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र, कलम १० पोट-कलम (२) अनुसार यथास्थिती नमुना क्र. ४ अथवा ४अ मध्ये देण्यात येईल आणि निबंधक जन्म आणि मृत्यू यांनी नोंदवहीत आवश्यक नोंदी केल्यानंतर, अशी सर्व प्रमाणपत्रे संबंधित महिन्यानंतरच्या पुढील महिन्यात १० तारखेपर्यंत उप मुख्य निबंधक जन्म आणि मृत्यू नोंदणी महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ यांच्याकडे पाठवतील.

(२) खालील वैद्यकीय व्यावसायिक किंवा वैद्यकीय संस्था उप-कलम (१) अन्वये संदर्भित प्रमाणपत्र देतील,

**(अ) नागरी भागासाठी.**—(१) महाराष्ट्र राज्यामधील सर्व जिल्ह्यातील, केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा सार्वजनिक संस्था किंवा खाजगी संस्था आणि सोसायटी किंवा विश्वस्त संस्था यांच्यातर्फे व्यवस्थापित करण्यात येणारी शुश्रुषालये, सुतिकागृहे यांसह सर्व रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय व्यावसायिक.

(२) महाराष्ट्र राज्यामधील सर्व जिल्ह्यातील नागरी क्षेत्रातील सर्व वैद्यकीय व्यावसायिक (महानगरपालिका, नगरपरिषदा, लष्करी छावण्या, लष्करी साहित्याचे उत्पादन करणारे कारखाने किंवा अशा स्थानिक वैद्यकीय संस्थामध्ये कार्यरत असलेले).

**(ब) ग्रामीण क्षेत्रात.**—ग्रामीण रुग्णालये, कुटीर रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय - एवं- रुग्णालये इत्यादी यांसह शासकीय रुग्णालये

(३) उपरोक्त नमूद केलेले वैद्यकीय व्यावसायिक, शुश्रुषालये आणि रुग्णालये यांनी सदर अधिनियमाखालील मृत्युसंबंधी माहिती देतांना संबंधित जन्म आणि मृत्यू निबंधक यांना देण्यासाठी मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र नमुना क्र. ४ मध्ये देण्यात यावेत.

(४) निवासी घटना प्रकरणी खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी मृत्यूच्या नातेवाईकांना संबंधित जन्म आणि मृत्यू निबंधक यांना मृत्यूसंबंधीची माहिती देण्यासाठी मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र नमुना क्र.४अ मध्ये देतील. ”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ॲना दाणी,

प्रधान सचिव (कुटुंब कल्याण).